अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

पोळा सणाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा...!

संपादक अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 10 सप्टेंबर 2026 | वर्ष 12 वे | अंक 05 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

## सर्वपक्षीय नेत्यांच्या उपस्थितीत दहीहंडी महोत्सव उत्साहात

### राजकीय आरोपांच्या फैरींनी ब्रम्हपुरीचे वातावरण तापले

ब्रम्हपुरी/का.प्र.

सार्वजनिक दहीहंडी उत्सव समिती, ब्रम्हपुरी तर्फे गोकुळाष्टमी निमित्त रविवारी (दि. ०६ सप्टेंबर २०२६) बारई कॉम्प्लेक्सच्या मागील पटांगणावर भव्य दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वपक्षीय नेत्यांच्या उपस्थितीमुळे या सांस्कृतिक कार्यक्रमाला राजकीय रंग चढल्याचे पाहायला मिळाले.



कार्यक्रमाचे उद्घाटन चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा क्षेत्राच्या खासदार प्रतिभाताई धानोरकर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगर परिषदेचे प्रथम नगराध्यक्ष अशोक भैया होते. तर प्रमुख अतिथी म्हणून चिमूर विधानसभा क्षेत्राचे आमदार बंटी भांगडीया, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष रविंद्रजी शिंदे, संचालक दामोधरजी मिसार, यशवंत दिघोरे, रोहित बोम्मावार, गणेशजी तर्वेकर, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मानद सचिव आवेश पठाण, माजी नगरसेवक गौरव भैया, जिल्हा परिषद चंद्रपूरचे माजी उपाध्यक्ष क्रिष्णा सहारे, माजी बांधकाम सभापती विलास विखार, काँग्रेस नगरसेवक अनुकूल शेंडे, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) नगरसेवक अविनाश राऊत, नगरसेवक मनोज भूपाल, डॉ. सतीशजी कावळे माजी उपाध्यक्ष नगर परिषद ब्रम्हपुरी, भाजपा तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर दिवटे, संतोषजी रडके तालुकाध्यक्ष भाजपा नागभीड, नानाजी तुपट माजी तालुकाध्यक्ष भाजपा ब्रम्हपुरी, माजी नगरसेविका रश्मी

(उर्वरित पान क्र. ६ वर)

**खासदार प्रतिभा धानोरकर आणि आमदार तथा काँग्रेसचे जेष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांच्यातील शीत युध्द सर्वपरिचित आहे. मागील विधानसभा निवडणूकीत खास. धानोरकर यांनी अप्रत्यक्षपणे विजय वडेट्टीवार यांच्या विरोधी भूमिका घेत प्रतिस्पर्धी उमेदवार भाजपाचे क्रिष्णलाल सहारे यांचे अप्रत्यक्षपणे समर्थन केले होते. भाजपाप्रणित दहिहंडी कार्यक्रमातील त्यांची उपस्थिती आम. वडेट्टीवार यांना शह देण्याचा प्रकार मानला जात आहे. भाजपाचे प्रमुख नेते आम. बंटी भांगडिया, माजी जि.प. अध्यक्ष सतिश वारजूरकर, सीडीसीसी बँकेचे अध्यक्ष रविंद्र शिंदे यांच्यासोबत उपस्थित राहून खास. धानोरकर यांनी काँग्रेस गोटात खळबळ निर्माण केली आहे. भविष्यात राजकीय समीकरण बदलण्याची ही नांदी तर नव्हे, याबाबत उलट-सुलट चर्चा सुरू आहे.**

## उपविभागीय कार्यालयावर धडकला सर्वसामान्यांचा जनआक्रोश मोर्चा

### धम्मा खडसे आणि विजय शेन्डे यांच्या महाजलसा कार्यक्रमाने मोर्चा ठरला लक्षवेधी

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या वतीने शेतकरी, शेतमजूर, कामगार, जबरानजोत धारक, महिला, विद्यार्थी, युवक, बेरोजगार तसेच संजय गांधी श्रावणबाळ योजनेतील निराधारांच्या विविध मागण्यांसाठी मंगळवार, दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी ब्रम्हपुरीमध्ये जनआक्रोश महामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.




या महामोर्चाची सुरुवात हुतात्मा स्मारक, वडसा रोड, ब्रम्हपुरी येथून सकाळी १२ वाजता सुरू होऊन, मोर्चा ब्रम्हपुरी उपविभागीय कार्यालयावर धडकला. 'दे धडक बैलगाडी, ट्रॅक्टर' किसान सभा जिंदाबाद, शेतकऱ्यांना धानाचा बोनस मिळालाच पाहिजे, सर्व शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्या, अशा घोषवाक्यासह अमरावतीचे क्रांतिकारी लोक शाहीर कॉ.धम्मा खडसे व गडचिरोलीचे लोक शाहीर विजय शेंडे यांच्या महाजलसा कार्यक्रमातून हा मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाचे नेतृत्व शेतकरी नेते कॉम्रेड विनोद झोडगे पाटील यांनी केले.

या मोर्चाच्या प्रमुख मागण्यांमध्ये शेतीमालाला उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव देणे, कर्जमाफी करणे, संन २०२५-२६ ची शेतकऱ्यांची हेक्टरी १० हजार रुपयांची प्रोत्साहनपर रक्कम तात्काळ देणे, नियमित वीजपुरवठा करून शेतकऱ्यांना प्रस्तावित २ हजार रुपयांचे अनुदान तातडीने देणे आणि वादळी वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई तात्काळ देणे ,तसेच जबरनजोत धारकांना जमिनीचे पट्टे व घराचे पट्टे देणे, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली व गोंदिया प्रस्तावित समृद्धी महामार्ग रद्द करणे, सर्व नोंदणी गट महिला व बँकिंगसाठी तसेच महिलांना कर्जमाफीचा लाभ देणे, गोसेखुर्दच्या उजव्या कालव्याचे पाणी ब्रम्हपुरी विभागातील सर्व शेतकऱ्यांना देणे आणि स्मार्ट मीटर लावणे बंद करून लावलेले स्मार्ट मीटर काढून घेणे याशिवाय शेतकऱ्यांना अनुदानावर देण्यात येणाऱ्या ट्रॅक्टरची १.२५ लाख रुपयांची सबसिडी देणे, शेतकऱ्यांचा लागणारा डिझेल टँकर फी करणे, वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करणे, हल्ल्यात मृत व्यक्तीच्या कुटुंबाला ५० लाख रुपयांची मदत देणे, रासायनिक खते व कीटकनाशकांचे दर कमी करणे तसेच संजय गांधी व श्रावणबाळ निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना सहा महिन्यांपासून प्रलंबित असलेले मानधन तात्काळ देणे आदी मागण्या करण्यात आल्या.

सदर मोर्चा बैल बंडी ट्रॅक्टर आणि हजारो शेतकरी शेतमजूर, महिला उपस्थितीत मोर्चा तहसील कार्यालयावर धडकला. मोर्चाचे रुपांतर जाहीर सभेत झाले. यावेळेस उपस्थित मोर्चाला शेतकरी नेते कॉ.विनोद झोडगे, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे गडचिरोली जिल्हा सहसचिव कॉ.जगदीश मेश्राम, रिपब्लिकन पक्ष खोरीपा चे युवा नेते प्रशांत डांगे, जीवन बागडे यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर मागण्याचे निवेदन उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत नायब तहसीलदार बोबाटे यांच्या वतीने मुख्यमंत्री, कृषी मंत्री यांना पाठविण्यात आले. या मोर्चात ब्रम्हपुरी तालुक्यातील शेतकरी, बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## संपादकीय...

# आवाजाचा अतिरेक नको!

डीजे म्हणजे केवळ संगीत वाजवणारी यंत्रणा नव्हे, तर आजच्या व्यवहारात प्रचंड क्षमतेच्या ध्वनीव्यवस्थेचे पर्यायवाची रूप झाले आहे. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आवाज अधिक प्रभावी, अधिक मोठा आणि अधिक दूरवर पोहोचविता येतो. त्यामुळे त्याचा वापर संयमाने न झाल्यास त्याचे परिणामही व्यापक होतात. उत्सवाच्या काही तासांच्या जल्लोषासाठी आसपासच्या रहिवाशांना रात्रभर जागे ठेवणे, विद्यार्थ्यांच्या अभ्यासात व्यत्यय आणणे, रुग्णांची झोपमोड करणे किंवा वृद्धांना त्रास देणे याला आनंदाचा उत्सव कसे म्हणता येईल?

मोठ्या आवाजाचा परिणाम सर्वप्रथम कानांवर होतो. कानाच्या आतील भागातील अतिशय नाजूक संवेदनशील पेशी ध्वनीचे संदेश मेंदूपर्यंत पोहोचवतात. अतितीव्र आवाजाचा दीर्घकाळ किंवा वारंवार संपर्क आल्यास या पेशींना इजा होऊ शकते. मोठ्या आवाजानंतर कान बंद झाल्यासारखे वाटणे, आवाज बोथट ऐकू येणे किंवा कानात शीळ, घंटा अथवा भुणभुण ऐकू येणे ही त्याची सुरुवातीची लक्षणे असू शकतात. बाहेर आवाज नसतानाही कानात आवाज येण्याला 'टिनिटस' म्हणतात. हा त्रास वारंवार होऊ लागला तर श्रवणक्षमतेवर कायमस्वरूपी परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. महत्त्वाचे म्हणजे, कानाला होणारे नुकसान अनेकदा हळूहळू होते आणि त्याची जाणीव उशिरा होते.

ध्वनीप्रदूषणाचा संबंध केवळ श्रवणदोषाशी जोडणेही अपुरे आहे. मोठ्या आवाजामुळे शरीरात ताण निर्माण होऊ शकतो. चिडचिड, अस्वस्थता, डोकेदुखी आणि मानसिक थकवा जाणवू शकतो. विशेषतः रात्री उशिरापर्यंत सुरू राहणाऱ्या ध्वनी व्यवस्थेमुळे झोपेचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. वारंवार झोपमोड झाल्यास दुसऱ्या दिवशी थकवा, एकाग्रतेचा अभाव आणि कार्यक्षमतेत घट जाणवू शकते. विद्यार्थ्यांसाठी हा प्रश्न अधिक गंभीर आहे. अभ्यास, परीक्षा किंवा ऑनलाइन शिक्षणाच्या काळात सततचा मोठा आवाज त्यांच्या एकाग्रतेवर परिणाम करू शकतो. हृदय आणि रक्तदाबावरही ध्वनी प्रदूषणाचे परिणाम होऊ शकतात. मोठ्या आवाजामुळे काही व्यक्तींमध्ये हृदयाचे ठोके वाढणे, रक्तदाब वाढणे आणि धडधड जाणवणे अशा प्रतिक्रिया दिसतात. दीर्घकाळ ध्वनीप्रदूषणाच्या संपर्कामुळे उच्च रक्तदाब आणि हृदयविकाराचा धोका वाढण्याची शक्यता अभ्यासांमधून अधोरेखित झाली आहे. विशेषतः आधीपासून आरोग्याच्या समस्या असलेल्या व्यक्तींनी अशा वातावरणापासून दूर राहणे अधिक योग्य. बालके, वृद्ध आणि रुग्णांना मोठ्या आवाजाचा त्रास अधिक जाणवतो. प्राणी आणि पक्ष्यांवरही ध्वनीप्रदूषणाचा परिणाम होतो. त्यामुळे हा प्रश्न माणसाच्या कानापुरता मर्यादित नाही; तो पर्यावरणाशीही जोडलेला आहे.

याच कारणामुळे ध्वनीची मर्यादा निश्चित करणारे कायदे आणि नियम अस्तित्वात आहेत. औद्योगिक, व्यापारी, निवासी आणि शांतता क्षेत्रांसाठी दिवसा आणि रात्री वेगवेगळ्या ध्वनिमर्यादा निश्चित करण्यात आल्या आहेत. रात्री १० ते सकाळी ६ या वेळेत ध्वनिक्षेपकांच्या वापरावर निर्बंध आहेत. शाळा, रुग्णालये आणि न्यायालयांच्या परिसराला शांतता क्षेत्र म्हणून संरक्षण देण्यात आले आहे. या नियमांकडे उत्सवविरोधी भूमिका म्हणून पाहणे चुकीचे आहे. नियमांचा उद्देश उत्सव रोखणे नसून नागरिकांचे आरोग्य, झोप आणि सार्वजनिक शांतता जपणे हा आहे.

प्रश्न शेवटी डीजे असावा की नसावा, एवढाच नाही. प्रश्न आहे तो आवाज किती असावा आणि कोणाच्या किमतीवर असावा? उत्सवाच्या आनंदासाठी इतरांच्या आरोग्याचा आणि मानसिक शांततेचा बळी देण्याची गरज नाही. पारंपरिक वाद्ये, सांस्कृतिक कार्यक्रम, भजन, कीर्तन आणि सामूहिक उपक्रम यांच्या माध्यमातूनही जल्लोष करता येतो. आधुनिक ध्वनीतंत्रज्ञानाचा वापर करायचा असेल तर तोही नियमांच्या चौकटीत करता येतो. उत्सव म्हणजे समाजाला जोडणारा धागा. त्यामुळे उत्सव साजरा करताना शेजाऱ्याचा विचार करणे, रुग्णांची झोप जपणे, विद्यार्थ्यांचा अभ्यास अबाधित ठेवणे आणि वृद्धांच्या त्रासाची जाणीव ठेवणे हीच खरी सामाजिक जबाबदारी आहे. पोलिस आणि प्रशासनाने नियमांची अंमलबजावणी करणे आवश्यकच; परंतु त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे मंडळांनी आणि नागरिकांनी स्वेच्छेने संयम पाळणे.

# शिस्तबध्द व तज्ज्ञ प्राध्यापक महाविद्यालयाचा सन्मान

## निरोप व सत्कार समारंभात ॲड. प्रकाश भैया यांचे प्रतिपादन



ब्रह्मपुरी/का.प्र.

'कोणत्याही विषयाचा प्राध्यापक हा आपल्या विषयात तज्ज्ञ असावा लागतो. ज्ञान हे प्रवाही असले पाहिजे. अनेक पिढया आपल्या हातून घडतात. डॉ.खाजगीवाले वाणिज्य विषयात पारंगत होते, असे शिस्तबद्ध व तज्ज्ञ प्राध्यापक महाविद्यालयाचा सन्मान असतो.' असे विचार नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. प्रकाश भैया यांनी मांडले. ते नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील डॉ. अजित खाजगीवाले यांच्या निरोप व सत्कार समारंभात बोलत होते.

विचारपीठावर अध्यक्षस्थानी कार्य. प्राचार्य डॉ.सुभाष शेकोकर होते तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सहसचिव ॲड भास्करराव उराडे, ज्येष्ठ सदस्य प्रा.सुभाष बजाज, पर्यवेक्षक प्रा.आनंद भोयर, समिती अध्यक्ष डॉ.धनराज खानोरकर व सत्कारमूर्ती डॉ.अजित खाजगीवाले, प्रिती खाजगीवाले उपस्थित होते. यावेळी पाहूण्यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, भेटवस्तू देऊन सत्कारमूर्तीचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यानंतर पाहूण्यांनी डॉ खाजगीवाले यांच्या व्यक्तित्वाचे पैलू उलगडले.

प्रास्ताविक व पाहूण्यांचा परिचय डॉ. धनराज खानोरकर, संचालन डॉ.वर्षा चंदनशिवे तर उपस्थितांचे आभार प्रा. निलिमा रंगारीनी मानले. यशस्वीतेसाठी प्रा.अजय खोब्रागडे, प्रा.मेंघरे, प्रा.पराते, प्रज्ञा मेश्राम, विलास खोब्रागडे इत्यादींनी सहकार्य केले.

# वाढीव वीज बिलामुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त

## भाकपची वीज बिल कमी करण्याची मागणी; गांगलवाडी येथे महावितरणला निवेदन

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यातील मुडझा, हळदा, आवळगाव, भूज,



वांद्रा, बरडकिन्ही व गांगलवाडी परिसरात नव्याने बसवण्यात आलेल्या 'स्मार्ट मीटर'मुळे वीज बिलात दहापटीने वाढ झाली असून सर्वसामान्य वीज ग्राहक अक्षरशः मेटाकुटीस आला आहे. ही वाढीव वीज बिले तत्काळ दुरुस्त करून नागरिकांना दिलासा द्यावा, या मागणीसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या (भाकप) वतीने महावितरणच्या गांगलवाडी येथील सहाय्यक अभियंत्यांना धडक निवेदन देण्यात आले.

यावेळी भाकपचे नेते विनोद झोडगे पाटील यांनी महावितरणच्या कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला. 'स्मार्ट मीटर बसविल्यापासून वीज बिलांमध्ये भरमसाठ वाढ झाली आहे. सरासरीपेक्षा पाच ते दहापट जास्त रक्कम बिलांवर आकारली जात असल्याने नागरिकांचे आर्थिक बजेट पूर्णपणे कोलमडले आहे. महावितरणने पारदर्शक तपासणी करून वाढीव आकारणी त्वरित रद्द करावी,' हा प्रश्न फक्त गांगलवाडी परिसरातील नागरिकांचा नसून संपूर्ण महाराष्ट्रातील नागरिकांचा आहे. असा थेट आरोप त्यांनी केला.

या आंदोलनादरम्यान मुडझा गांगलवाडी परिसरातील बाधित वीज ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते. वाढीव बिलांची तातडीने दुरुस्ती न झाल्यास आणि स्मार्ट मीटरच्या तांत्रिक त्रुटी दूर न केल्यास महावितरण कार्यालयावर तसेच उपविभागीय कार्यालय वर नागरिकांच्या वतीने बैल बंडी, ट्रॅक्टर सह उग्र जन आक्रोश मोर्चा काढला जाईल, असा इशाराही यावेळी कॉम्रेड विनोद झोडगे यांनी दिला आहे.

निवेदन सादर करतेवेळी कॉ. विनोद झोडगे पाटील, नानाजी झरकर, गोलू दरवे, विनोद पाटील अमोल मानापुरे यांच्यासह मुडझा, गांगलवाडी व लगतच्या परिसरातील शेतकरी, व्यावसायिक आणि स्थानिक वीज ग्राहक उपस्थित होते.


ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता

www.bramhapuri samachar.com/bs

या ऑनलाईन साईटला भेट द्या

बातम्यांकरीता संपर्क :

मो. 9503100964
मो. 8275715315


## विनोदिनी

दसवी कक्षा की परीक्षा चल रही थी... पप्पू हिंदी विषय का पेपर दे रहा था, पेपर में पूछा गया कि –
निचे दिए गए वाक्य का अंग्रेजी में अनुवाद करें –'संतोष आम खाता है !'
पप्पू ने अनुवाद किया,
जिसे पढ़कर अध्यापक की ही नहीं अंग्रेजी की भी आत्मा कॉंप गई.... उसने जवाब में लिखा था....
satisfaction is a general account!!

# ब्रम्हपुरी तालुक्यात मिशन सुधारअंतर्गत १,७३८ अपात्र शिधापत्रिकांची पडताळणी

## ई-केवायसी व मोबाईल सिडिंग १० ते १८ सप्टेंबर या कालावधीत पूर्ण करण्याचे आवाहन

ब्रम्हपुरी/का.प्र.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत ब्रम्हपुरी तालुक्यातील एकूण ३९ हजार ६४ शिधापत्रिकांपैकी १ हजार ७३८ शिधापत्रिका विविध कारणांमुळे अपात्र यादीत आल्या आहेत. या शिधापत्रिकांची पडताळणी करून पात्रतेनुसार त्या रद्द करणे अथवा एनपीएच किंवा एपीएल शुभ्र योजनेत वर्ग करण्याची कार्यवाही पुरवठा विभागामार्फत सुरू करण्यात आली आहे.

मिशन सुधार मोहिमेंतर्गत अपात्र ठरलेल्या शिधापत्रिकांमध्ये आयकर भरणे, जीएसटी भरणे, नोकरीवर असणे, चारचाकी वाहन असणे, दुबार शिधापत्रिका, कंपनीचे संचालक असणे, सलग तीन महिन्यांपासून धान्याची उचल न करणे आदी कारणांचा समावेश आहे. संबंधित अपात्र शिधापत्रिकांची यादी तालुक्यातील सर्व स्वस्त धान्य दुकानदारांकडे उपलब्ध करून देण्यात आली आहे. अपात्रतेच्या निकषात येणाऱ्या लाभार्थ्यांनी आपली शिधापत्रिका तात्काळ रद्द अथवा पात्रतेनुसार वर्ग करून घेणे आवश्यक आहे. अन्यथा संबंधित लाभार्थ्यांकडून बाजारभावानुसार धान्याची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही होण्याची शक्यता असल्याचे पुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे.

ब्रम्हपुरी तालुक्यात अंत्योदय व प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेचे एकूण १ लाख ४५ हजार ४०८ लाभार्थी आहेत. त्यापैकी २२ हजार ४०८ लाभार्थ्यांची अद्याप ई-केवायसी झालेली नाही. विहित मुदतीत ई-केवायसी पूर्ण न केल्यास संबंधित लाभार्थ्यांचा धान्याचा लाभ बंद होऊ शकतो. प्रलंबित ई-केवायसी तसेच मोबाईल सीडिंग पूर्ण करण्यासाठी १० ते १८ सप्टेंबर २०२६ या कालावधीत तालुक्यातील सर्व स्वस्त धान्य दुकानांमध्ये विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. लाभार्थ्यांनी आपल्या जवळच्या स्वस्त धान्य दुकानात जाऊन ई-केवायसी व मोबाईल सीडिंगची प्रक्रिया तात्काळ पूर्ण करून घ्यावी. तसेच 'मेरा राशन' ॲपद्वारेही ई-केवायसी पूर्ण करता येणार आहे, असे अमित कांबळे, पुरवठा निरीक्षण अधिकारी, ब्रम्हपुरी यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# एलएमबी स्कुलमध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा




ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील एल. एम. बी. पब्लिक स्कुलमध्ये ५ सप्टेंबर ला शाळेत शिक्षक दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून एलएमबी पब्लिक स्कूलचे अध्यक्ष अशोकजी भैया सर होते. यावेळी थोर शिक्षणतज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पन करून दीप प्रज्वलन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरूवात गुरूवंदनेने करण्यात आली. शिक्षक दिनाच्या निमित्याने शाळेचे संपूर्ण कामकाज त्या दिवशी वर्ग १० वी च्या विद्यार्थ्यांनी सांभाळले. विद्यार्थ्यांना शिक्षकांची भूमिका पार पाडत या दिवसाचे औचित्य साध्य केले. वर्ग १० वी च्या विद्यार्थ्यांना शाळेचा कार्यभार सांभाळण्यासाठी शाळेच्या संचालिका यांनी मार्गदर्शनात 'शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देणारा शिल्पकार असतो' असे सांगितले. अशाप्रकारे विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने शिक्षक दिन साजरा केला. यावेळी स्कुलचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# जय किसान ग्रामीण सहकारी बँकेच्या नवीन शाखेचे उद्घाटन

ब्रम्हपुरी/का.प्र.

जय किसान ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. ब्रह्मपुरी अंतर्गत मौजा पिंपळगाव भोसले ता. ब्रह्मपुरी येथे नवीन शाखेचे उद्घाटन स्वप्निल पाटील सहायक निबंध सहकारी संस्था ब्रह्मपुरी यांचे हस्ते, पतसंस्थेचे अध्यक्ष दामोधरजी मिसार संचालक को-ऑपरेटिव्ह बँक चंद्रपूर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

कार्यक्रमाला विशेष अतिथी यशवंतजी दिघोरे संचालक चंद्रपूर जिल्हा सहकारी बँक तसेच प्रमुख अतिथी सुरेशजी दुनेदार सरपंच ग्रामपंचायत पिंपळगाव भोसले, केशवराव भुते संचालक बाजार समिती ब्रह्मपुरी, वामनजी मिसार अहेरनवरगाव, निखिल लोंढे पोलीस पाटील पिंपळगाव, उमाजी कुथे माजी सदस्य जिल्हा परिषद चंद्रपूर, देविदासजी गडे, अण्णाजी ठाकरे, संभाजी ढोंगे, प्रभाकर बांगरे माजी पोलीस पाटील, सुरेश आडकिने, मंगल पिल्लेवान, सुधीर दोनाडकर उपस्थित होते.

ग्रामीण भागामध्ये आपल्या कमाईची योग्य विल्हेवाट व्हावी किंवा अडचण पडल्यास कर्जरूपाने कर्ज घेऊन आपल्या गरजा भागवाव्या तसेच संस्थेच्या उलाढाली व संस्थेच्या प्रगतीचा आढावा आपल्या प्रस्ताविकेतून ओमप्रकाश बगमारे उपाध्यक्ष यांनी सादर केला. पतसंस्थेतर्फे पहिल्या पाच खातेदारांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन घ्यार सर यांनी केले तर आभार प्रदर्शन व्यवस्थापक मनोहरजी शेंडे यांनी केले. कार्यक्रमाला बहुसंख्य नागरिक उपस्थित होते. सफलतार्थ पतसंस्थेचे सर्व कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# 'हर घर तिरंगा अभियान' अंतर्गत स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद

ब्रम्हपुरी/का.प्र.

'हर घर तिरंगा' अभियान अंतर्गत नगर परिषद, ब्रम्हपुरी यांच्या वतीने देशभक्तीची भावना जागृत करण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत चित्रकला, निबंध, रांगोळी, प्रश्नमंजुषा व रील्स स्पर्धा घेण्यात आल्या. चित्रकला, निबंध, रांगोळी व प्रश्नमंजुषा स्पर्धा या दोन वयोगटांमध्ये म्हणजे गट क्र. १ (वय ६ ते १८ वर्षे) आणि गट क्र. २ (वय १८ वर्षांवरील) आयोजित करण्यांत आल्या, तर रील्स स्पर्धा खुल्या गटामध्ये घेण्यात आली. प्रत्येक गटामध्ये प्रथम व द्वितीय अशी पारितोषिके ठेवण्यात आली होती.

पहिल्या गटातील चित्रकला स्पर्धेत लेशिका कमल मंडले (हिंदू ज्ञान मंदिर) हिने प्रथम, तर राम प्रशांत दलाल (लोकमान्य टिळक विद्यालय) याने द्वितीय पारितोषिक पटकाविले. प्रश्नमंजुषा स्पर्धेत तक्षत ईशान सोनडवले (मदर्स पेठ स्कूल) प्रथम व कल्याणी प्रमोद बुरडे (लोकमान्य टिळक ज्युनिअर कॉलेज) द्वितीय क्रमांकाच्या मानकरी ठरली. निबंध स्पर्धेत आदित्य जगदीश कलाम (ने. हि. हायस्कूल) याने प्रथम, तर साक्षी ताराचंद बावणे हिने द्वितीय पारितोषिक मिळविले. रांगोळी स्पर्धेत मीनल राजरतन गणवीर (विद्यानगर) प्रथम, तर हिमांशू यादव उरकुडे (शिवनगर) याने द्वितीय पारितोषिक पटकाविले.

१८ वर्षांवरील दुसऱ्या गटामध्येमध्ये चित्रकला स्पर्धेत मनोज गजानन गजपुरे (झाशी राणी चौक) यांनी प्रथम, तर ऋतुजा वसंत भूपाल (पटेल नगर) यांनी द्वितीय पारितोषिक मिळविले. प्रश्नमंजुषा स्पर्धेत गोवर्धन नामदेव टिकले प्रथम व पूजा रतिराम गेडाम द्वितीय क्रमांकाच्या मानकरी ठरल्या. निबंध स्पर्धेत तेजस्विनी होमराज भाजीपाले (ने. हि. कॉलेज) यांनी प्रथम, तर सौ. जयश्री दिलीप कुथे (विद्यानगर) यांनी द्वितीय पारितोषिक प्राप्त केले. रांगोळी स्पर्धेत प्रथम पारितोषिक मनोज गजानन गजपुरे (झाशी राणी चौक) व द्वितीय पारितोषिक ऋतुजा वसंत भूपाल (पटेल नगर) यांनी मिळविले.

खुल्या गटातील रील्स स्पर्धेत तनवीर खान पठाण यांनी प्रथम, तर सम्यक युवराज मेश्राम यांनी द्वितीय पारितोषिक पटकावून स्पर्धेचे मानकरी ठरले.

नगर परिषद, ब्रम्हपुरी यांच्या वतीने सर्व विजेत्या स्पर्धकांचे मन:पूर्वक अभिनंदन करण्यात आले असून, विजेत्या स्पर्धकांना लवकरच नगर परिषद कार्यालयामार्फत सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. बक्षीस वितरणाचा दिनांक व वेळ संबंधित विजेत्या स्पर्धकांना वैयक्तिक संपर्क साधून कळविण्यात येईल. तसेच, या स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र नगर परिषद, ब्रम्हपुरीच्या आरोग्य विभागामार्फत दि. २८ सप्टेंबर २०२६ ते दि. ०९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत वितरित करण्यात येणार आहे.

नियमित वाचा
ब्रम्हपुरी समाचार

# नेवजाबाई हितकारिणी विद्यालयात शिक्षक दिन व दहीहंडी उत्सव साजरा

## विद्यार्थ्यांनी अनुभवले शिक्षक पदाचे दायित्व; गोपालकाल्याने रंगले विद्यालयाचे वातावरण

ब्रह्मपुरी/का.प्र.

शिक्षणातून नेतृत्व, संस्कारातून व्यक्तिमत्त्व विकास आणि संस्कृतीतून आनंदाचा संदेश देत नेवजाबाई हितकारिणी माध्यमिक तथा उच्च माध्यमिक विद्यालय, ब्रह्मपुरी येथे शिक्षक दिन तसेच श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडी उत्सव उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. शिक्षक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या स्वयंशासन उपक्रमात विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिका समर्थपणे पार पाडत शालेय कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला, तर दहीहंडी उत्सवात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत



उत्सवाचा आनंद लुटला.

कार्यक्रमासाठी नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक के. एम. नाईक सर होते, तर प्रमुख अतिथी म्हणून उपमुख्याध्यापक ए. डब्ल्यू. नाकाडे सर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भारताचे माजी राष्ट्रपती, महान शिक्षणतज्ज्ञ व तत्त्वज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांच्या सहभागातून स्वयंशासन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका स्वीकारत विविध शैक्षणिक व प्रशासकीय जबाबदाऱ्या पार पाडल्या. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना नेतृत्व, निर्णयक्षमता, शिस्त, जबाबदारी आणि शालेय प्रशासनाची प्रत्यक्ष अनुभूती मिळाली. त्यानंतर श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त श्रीकृष्णाची विधिवत पूजा व माल्यार्पण करण्यात आले. विद्यालयातील कर्मचारीवृंदाने भक्तिमय वातावरणात विविध भजने सादर केली. तसेच गोपालकाला कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. भजनांच्या स्वरांनी आणि भक्तिमय वातावरणाने विद्यालय परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. यानंतर विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात दहीहंडी फोडत श्रीकृष्ण जन्माष्टमीचा आनंद द्विगुणित केला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण विद्यालय परिसरात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मण मेश्राम सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन मंगेश कळंबे सर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी प्रतिनिधींनी विशेष सहकार्य केले. शिक्षकांविषयी कृतज्ञता, विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण आणि भारतीय संस्कृतीशी नाते दृढ करणारा हा उपक्रम विद्यालयात आनंददायी, भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## डॉ. लेनगुरे यांचा उत्कृष्ट महाविद्यालयीन शिक्षक म्हणून सन्मान

ब्रम्हपुरी/का.प्र.

शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे ने. हि. भैया हितकारिणी शिक्षण संस्थेच्या नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरी येथील वाणिज्य विभागाचे प्रा. डॉ. भास्कर ल. लेनगुरे यांचा चंद्रपूर जिल्ह्यातील 'उत्कृष्ट महाविद्यालयीन शिक्षक' म्हणून गौरव करण्यात आला. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, गोविंदराव बंजारी फाऊंडेशन व गोविंद मेना फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिनानिमित्त 'उत्कृष्ट शिक्षक सन्मान सोहळा-२०२६' आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात चंद्रपूर, वर्धा व गडचिरोली जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा, प्राध्यापकांचा व प्राचार्यांचा सन्मान करण्यात आला.

डॉ. भास्कर लेनगुरे हे एन. एच. कॉलेज, ब्रम्हपुरी येथे



२००७ पासून अध्यापन कार्य करीत असून त्यांना पदवी व पदव्युत्तर स्तरावरील १९ वर्षांचा अध्यापन अनुभव आहे. विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक कामांमध्ये त्यांनी दीर्घकाळ योगदान दिले असून ते गोंडवाना विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे Ph.D. मार्गदर्शक म्हणूनही कार्यरत आहेत. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरीय परिषदांमध्ये त्यांनी ३२ शोधप्रबंध सादर केले असून Marketing Management हे पुस्तकही प्रकाशित केले आहे.

यापूर्वीही त्यांना स्वप्नपूर्ती एज्युकेशन अँड रिसर्च फाऊंडेशन, पुणे यांच्या वतीने आयोजित सोहळ्यात 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार-२०२५' प्रदान करण्यात आला होता. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल त्यावेळीही त्यांचा गौरव करण्यात आला. तसेच त्यांना STAMI Ûee Best Teacher Award प्राप्त झाला आहे.

या दुहेरी सन्मानामुळे ब्रह्मपुरीच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण असून, ने. हि. भै. शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैया, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. शेकोकर, सहकारी प्राध्यापक व विद्यार्थी यांनी डॉ. भास्कर लेनगुरे यांचे अभिनंदन केले.डॉ. भास्कर लेनगुरे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## शिवराज मालवींना जलतरण स्पर्धेत कांस्य




ब्रह्मपुरी/का.प्र.

वयाच्या ६४ व्या वर्षीही क्रीडा क्षेत्रातील जिद्द, मेहनत आणि सराव कायम ठेवत शिवराज मधुकरराव मालवी यांनी जलतरण स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळविले. वर्धा येथे आयोजित 'वर्धा स्विम गाला २०२६ - थर्ड एडिशन' या जलतरण स्पर्धेत त्यांनी ५० मीटर फ्रीस्टाईलच्या ५० वर्षांवरील पुरुष गटात तृतीय क्रमांक पटकावत कांस्यपदक मिळविले.

या स्पर्धेत शिवराज मालवी यांनी ५० मीटर फ्रीस्टाईलमध्ये ४३.६९ सेकंदांची वेळ नोंदविली. स्पर्धेत विद्यार्थी, विद्यार्थिनी, महिला व पुरुष अशा सुमारे ३०० जलतरणपटूंनी सहभाग घेतला होता. वाढत्या वयातही नियमित सराव आणि क्रीडा क्षेत्राप्रती असलेल्या समर्पणाच्या बळावर मालवी यांनी युवा जलतरणपटूंसोबत स्पर्धा करीत हे उल्लेखनीय यश संपादन केले. द ब्लूज स्पोर्ट्स अकादमी, वर्धा यांच्या वतीने एक्वाटिक असोसिएशन, वर्धाच्या संलग्नतेने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. उत्कृष्ट कामगिरीबद्दल शिवराज मालवी यांना 'सर्टिफिकेट ऑफ मेरिट' देऊन गौरविण्यात आले.

## नालंदा अभियान कॅम्पस उभारणीसाठी लोकसहभागाचे आवाहन

ब्रम्हपुरी/का.प्र.

'चला, मिळून उभारूया नालंदा अभियान कॅम्पस!' या उपक्रमांतर्गत कार्यक्रमाचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण संस्था, ब्रम्हपुरी द्वारा नुकतेच ब्रम्हपुरी पब्लिक स्कूलच्या सभागृहात संपन्न झाले. अध्यक्षस्थानी शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. देवेश कांबळे तर मार्गदर्शक म्हणून नालंदा अकॅडमी, वर्धाचे संस्थापक अनुप कुमार उपस्थित होते.

आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. देवेश कांबळे यांनी समाजातील आर्थिक तथा बौद्धिक सामर्थ्याचा उपयोग रचनात्मक, विधायक आणि समाजोपयोगी कार्यासाठी झाला पाहिजे. शिक्षण क्षेत्रात गुंतवणूक केल्यास त्याचा लाभ केवळ एका व्यक्तीला नव्हे, तर अनेक पिढ्यांना होतो, असे त्यांनी स्पष्ट केले. प्रमुख मार्गदर्शक अनुप कुमार यांनी नालंदा अभियानाच्या माध्यमातून आर्थिक तथा सामाजिकदृष्ट्या मागास पार्श्वभूमीतून येणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक संधी आणि मार्गदर्शन देण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे अनुप कुमार यांनी सांगितले. हा केवळ वास्तू उभारणीचा प्रकल्प नसून विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा देणारे शैक्षणिक केंद्र उभारण्याचा प्रयत्न असून या उपक्रमाला समाजातील विविध घटकांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. तुफान अवताडे, प्रास्ताविक ॲड. दिपांकर कांबळे यांनी तर आभार प्राचार्या रिमा कांबळे यांनी मानले.

# जनगणनेत ओबीसींच्या स्वतंत्र कॉलमसाठी धरणे आंदोलन

ब्रम्हपुरी/का.प्र.

आगामी जनगणनेमध्ये इतर मागासवर्गीयांसाठी (ओबीसी) स्वतंत्र कॉलमचा समावेश करून संगणकीय 'ड्रॉप-डाऊन मेन्यू'च्या माध्यमातून अचूक जातनिहाय नोंदणी करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी सकल ओबीसी महामोर्चा, ब्रम्हपुरी यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे धरणे आंदोलन करण्यात आले.

आगामी जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलमचा समावेश करण्यात आला नाही, तर जनगणनेवर बहिष्कार टाकण्यासह देशव्यापी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा यावेळी ओबीसी समाजबांधवांनी दिला. हा ओबीसींच्या हक्कांचा लढा पुढील काळात विविध टप्प्यांत अधिक तीव्र करण्यात येणार असल्याची माहिती आंदोलनादरम्यान देण्यात आली. सकल ओबीसी महामोर्चाचे मुख्य संयोजक उमेश कोर्राम यांच्या माध्यमातून विविध राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांची भेट घेऊन देशव्यापी लढ्यासाठी तयारी सुरू असल्याचे सांगण्यात आले.

तसेच आगामी काळात ओबीसी विद्यार्थी परिषद तसेच जनगणना यात्रा आयोजित करण्याचे नियोजनही या धरणे आंदोलनादरम्यान करण्यात आले. ओबीसी समाजाला त्यांच्या लोकसंख्येच्या अचूक नोंदीसह योग्य प्रतिनिधित्व मिळण्यासाठी स्वतंत्र कॉलम आवश्यक असल्याची भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली.

यावेळी उपस्थित ओबीसी बांधवांनी एकमुखाने मागणी केली की, आगामी जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलमचा समावेश करून जातनिहाय अचूक नोंदणी करण्यात यावी. अन्यथा ओबीसी समाज जनगणनेवर बहिष्कार टाकून तीव्र देशव्यापी आंदोलन उभारेल, असा इशाराही देण्यात आला. या धरणे आंदोलनात ब्रम्हपुरी परिसरातील मोठ्या संख्येने ओबीसी समाजबांधव उपस्थित होते.

# रक्षाबंधन प्रेम, त्याग आणि विश्वासाचे प्रतिक
## प्रा. अतुल देशकर

ब्रम्हपुरी/का.प्र.

'रक्षाबंधन हा केवळ धागा बांधण्याचा सण नाही. तर ते प्रेम, त्याग आणि अतुट विश्वासाचे प्रतीक आहे. या दिवशी बहिण भावाच्या हातावर राखी बांधून



त्याच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करतो, तर भाऊ तीच्या रक्षणाची जबाबदारी घेतो. आजच्या आधुनिक काळात या सणाचे महत्व अधिक वाढले आहे. आज आपल्याला फक्त बहिणीचे नाही, तर समाजातील प्रत्येक स्त्रीचे रक्षण आणि आदर करण्याचा संकल्प करावा लागेल, असे ग्रामीण व शहर महिला भाजपा मोर्चाच्या वतीने भाजपा कार्यालयात आयोजित रक्षाबंधन कार्यक्रमात माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांनी अध्यक्षीय स्थानावरून संबोधीत केले. व सर्वांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी भाजपा शहर मोर्चा अध्यक्ष वर्षा चौधरी यांनी प्रास्ताविक केले. या प्रसंगी मंचावर माजी आमदार प्रा. अतुल देशकर, दिपक उराडे, अरुण शेंडे उपस्थित होते. तसेच दिपाली मेश्राम, सुर्याकांता गेडाम, रेश्मी पेशने, गीता जांभळे, सरिता गायकवाड, ललिता कामडी, वंदना शेंडे, रत्नाताई दंडवते, वर्षाताई जोशी, लक्ष्मी सहारे, उर्मिला धोटे, डॉ. हेमलता नंदुरकर, चेतना येवले, सुरेखा बालपांडे, तनय देशकर, साकेत भानारकर, अरविंद नंदुरकर, प्रा. प्रकाश बगमारे, नगरसेवक मनोज भूपाल, प्रा. संजय लांबे, प्रा. अशोक सालोटकर, राजु भागवत, ज्ञानेश्वर दिवटे, डॉ. बालपांडे, नानाजी गराडे, विलास खरवडे, सुभाष नाकतोडे, पुरुषोत्तम सडमाके, सुरेश बनपुरकर, राजु चौधरी उपस्थित होते.

# ब्रम्हपुरी बसस्थानकात मुलभूत सुविधांचा बोजवारा



ब्रह्मपुरी/का.प्र.

स्थानिक बस स्थानकात (डेपो) प्रवाशांना सहन कराव्या लागत असलेल्या विविध गैरसोयींबद्दल शिवसेना पक्षाने प्रशासनाविरुद्ध आक्रमक भूमिका घेतली आहे. शिवसेना तालुकाप्रमुख नरेंद्र नरड यांच्या नेतृत्वात ब्रह्मपुरीच्या आगार व्यवस्थापकांना बस डेपोतील दुरवस्था तातडीने सुधारण्यासाठी निवेदन देण्यात आले.

ब्रह्मपुरी बस स्थानकातून दररोज हजारो नागरिक, विद्यार्थी आणि प्रवासी प्रवास करतात. असे असतानाही येथे प्रवाशांसाठी पुरेशी आणि स्वच्छ शौचालय व्यवस्था उपलब्ध नाही. शौचालयांच्या अनुपलब्धतेमुळे विशेषत: महिला, लहान मुले, वृद्ध आणि ज्येष्ठ नागरिकांना प्रचंड मनस्ताप व त्रास सहन करावा लागत आहे. 'स्वच्छ भारत अभियान' आणि महामंडळाच्या नियमांनुसार मूलभूत स्वच्छता व आरोग्यदायी सुविधा मिळणे हा प्रत्येक प्रवाशाचा हक्क असून येथे मात्र या सुविधेचा पूर्णत: अभाव दिसून येत आहे.

तसेच शासनाने सवलतीच्या प्रवासासाठी आणि विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्डचा (NCMC) अनिवार्य केले आहे. मात्र, अनेक दिवसांपासून हे कार्ड काढण्याची नोंदणी प्रक्रिया आणि वितरण काउंटर पूर्णपणे बंद आहे. काउंटर बंद असल्यामुळे नियमित प्रवासी, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांना शासनाच्या सवलतींपासून वंचित राहावे लागत असून त्यांना मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

स्थानकावर कायम-स्वरूपी स्वच्छ व सुसज्ज शौचालयांची व्यवस्था करण्यात यावी, तसेच बंद असलेले NCMC कार्ड नोंदणी व वितरण काउंटर त्वरित पूर्ववत सुरू करण्यात यावे, अन्यथा ०१ ऑक्टोबर २०२६ पासून शिवसेना प्रशासनाविरोधात तीव्र 'जनआंदोलन' छेडेल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

या प्रसंगी शिवसेना शहरप्रमुख अमोल माकोडे, आकाश शेंद्रे, अमोल ठीकरे, आशिष गांडलेवार, सुरज माकडे, गणेश लांजेवार, पंकज भोयर व शिवसैनिक प्रामुख्याने उपस्थित होते.

# स्व. बाबुरावजी भेंडारकर यांना अभिवादन



ब्रम्हपुरी/का.प्र.

दिवंगत ॲड. गोविंदराव भेंडारकर यांचे वडील, थोर स्वातंत्र्यसंग्राम सैनिक, लोकनेते माजी आमदार बाबुरावजी भेंडारकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त दिनाक ०५ सप्टेंबर २०२६ रोजी, ब्रम्हपुरी तालुका कॉंग्रेस कमिटी कार्यालयात त्यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन करण्यात आले. स्वातंत्र्यासाठी त्यांनी केलेला त्याग, संघर्ष आणि राष्ट्रसेवेची भावना यावर ब्रम्हपुरी तालुका कॉंग्रेस कमिटी अध्यक्ष खेमराज तिडके शहर कॉंग्रेस हितेंद्र राऊत यांनी संबोधित केले. यावेळी तालुका व शहर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# महाराष्ट्र फार्मसी बेटाळा येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाळा,ब्रम्हपुरी येथे डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या जयंतीनिमित्त दि. ५सप्टेंबर २०२६ला शिक्षक दिनाचे आयोजन करण्यात आले. या वेळेस प्राचार्य डॉ. सचिन दुधे यांनी डॉ.राधाकृष्णन् यांच्या प्रतीमेस पुष्पहार व फुले अर्पण करून अभिवादन करण्यात केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुहास साकरकर, डॉ. अनुप बारसागडे, प्रा. श्रीकांत महाजन, प्रा. पृथ्वीराज मेश्राम, प्रा. छगन डोईजड, प्रा. सविता वसाके, प्रा. पूजा घुटके, प्रा. रेश्मा मातेरे, प्रा. प्राची मांडवे, प्रा. दिशा मूल, प्रा. अमिषा जयस्वाल, प्रा. भूपेश भेंडारकर, प्रा. देवाशिश भरणे, प्रा. चेतन चौधरी, प्रा. खुशबू कापगते, सुधीर बडदे, भूपेश गोस्वामी, आशिष गजपुरे, सकलेन पठाणसह इतर प्राध्यापक गण, शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते. या प्रसंगी 'स्वयंशासन' हा उपक्रम विविध वर्गाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन खूपच सुंदर प्रकारे सादर केला. संचालन मृणाल दुर्गे यांनी तर आभार प्रदर्शन प्रणव नाईक यांनी केले.

**... QUOTES ...**

"Your time is limited, so don't waste it living someone else's life."
- Steve Jobs

**चारोळी**

मुठीत धरलं तरी
पाणी नाही थांबत...
नाक पुसलं तरी,
सर्दी नाही बसत...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# एल.एम.बी. स्कुलमध्ये जन्माष्टमी उत्सव सोहळा






ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील एल. एम. बी. पब्लिक स्कुलमध्ये दि. ४ ऑगष्टला श्रावण महिण्यातील कृष्ण अष्टमीला मध्यरात्री रोहिणी नक्षत्रावर भगवान श्रीकृष्णचा जन्म झाला. तो दिवस म्हणून श्रीकृष्ण जन्माष्टमीचा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी ने. हि. शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया, शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम यांच्यासह मुख्याध्यापक कादिर कुरेशी सार, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. या प्रसंगी पाहुण्यांचे स्वागत शब्दसुमनांनी करण्यात आले.

या कार्यक्रमाचा शुभारंभ मनमोहक व भक्तीमय वातावरणात प्रि- स्कुलच्या विद्यार्थ्यांनी 'राधा तेरी चुनरी.....' या गाण्याच्या राधा कृष्णाची वेशभुषा करून नृत्य सादर करून पाहुण्याचे स्वागत केले. त्यानंतर इयत्ता ११ वी च्या विद्यार्थ्यांनी 'मेरे कान्हाने बन्सी'... या गाण्याच्या तालावर नृत्य सादर केले. इयत्ता ७ वी, ८ वी व ९ वी च्या विद्यार्थिनीनी 'कान्हा सोजा जरा...' गीत सादर केले. इयत्ता ३ री व ६ वी च्या विद्यार्थ्यांनी कृष्ण जन्मापासून ते किशोर अवस्थापर्यंत सुंदर असे पटनाट्याचे सादरीकरण करून वातावरण मंत्रमुग्ध केले तर इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांनी कृष्णाच्या गाण्याच्या तालावर दही हंडी फोडून धमाकेदार श्रीकृष्ण जन्माष्टमी या कार्यक्रमाची सांगता केली. तसेच प्रि-स्कुलच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सुद्धा राधा कृष्णाचा वेश परिधान करून दही हंडीचा सोहळा व श्रीकृष्ण जन्माष्टमीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा केला.

सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन इयत्ता ७ वी च्या विद्यार्थीनी सृष्टी लांजेवार आणि सौम्या बेले यांनी केले तर आभार प्रदर्शन इयत्ता ७ वी चा विद्यार्थी विहान पत्रे याने केला. कार्यक्रमाला शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.




Miracle constructions & Developers

श्रीराम नगरी - डेव्हलपर्स

NATP प्लॉट्स उपलब्ध

- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501

डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.


# भरमार बंदूकीसह आणखी एक जण पोलीसांच्या ताब्यात

ब्रह्मपुरी/का.प्र.

प्राप्त माहितीनुसार, ८ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री १०:३० ते ११:३० च्या दरम्यान पोलीस उपनिरीक्षक रेखलाल गौतम, पोलीस अंमलदार रतन लेनगुरे, शरद सावसाकडे, अमोल लोनबले, अभिषेक आगाशे व शुभम लेडांगे हे मेंडकी पोलीस चौकीच्या हद्दीत खाजगी वाहनाने गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग करत होते. दरम्यान, एक इसम बेकायदेशीरपणे अग्नीशस्त्र बाळगून मेंडकी ते गणेशपूर रस्त्याने पायी जात असल्याची गुप्त बातमी पोलिसांना मिळाली. पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीसांनी घटनास्थळी धाव घेतली.

स्मशानभूमीजवळ संशयितरीत्या फिरणाऱ्या इसमाला पोलिसांनी चौकशी केली तेव्हा त्याने आपले नाव अंबरसिंग बच्चनसिंग दुधानी (वय ४० वर्षे, जात सिकलगर, व्यवसाय मजुरी, रा. रूपाळामेंढा/आकापूर, ता. ब्रह्मपुरी असे सांगितले. पंचांच्या समक्ष त्याची झाडाझडती घेतली असता, त्याच्याकडे एक लाकडी बनावटीची व लोखंडी नळी असलेली भरमार बंदूक मिळून आली. सदर अग्नीशस्त्राबाबत परवान्याची विचारणा केली असता आरोपीने परवाना नसल्याचे कबूल केले. जप्त करण्यात आलेला मुद्देमाल मध्ये देशी बनावटीची जुनी भरमार बंदूक (लांबी १३२ सेमी, लाकडी बॉडी ८७ सेमी, लोखंडी बॅरल ९१ सेमी), बारूद ठासण्यासाठी ८९ सेमीचा लोखंडी रॉड, ट्रिगर आणि स्टील पट्टीने बांधलेले बॅरल किंमत १२ हजार रुपये असा मुद्देमाल सापडून आला.आरोपी अंबरसिंग दुधानी याच्याविरुद्ध भारतीय हत्यार कायदा १९५९ च्या कलम ३, २५ अन्वये ब्रह्मपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# सर्वपक्षीय नेत्यांच्या उपस्थितीत दहीहंडी...

(पान क्र. ९ वरून)

पेशने, डॉ. तरलजी नागमोती व सुधीर दोनाडकर आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रसंगी कार्यक्रमाच्या उद्घाटीका चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा क्षेत्राच्या खासदार प्रतिभाताई धानोरकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना उपस्थित नागरिकांना गोकुळाष्टमीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या व दहीहंडी महोत्सवाच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल आयोजक समितीचे अभिनंदन केले.

डॉ. सतिश वारजूरकर यांनी सांगितले की, ब्रम्हपुरी या सांस्कृतिक आणि शैक्षणिक नगरीला लोकप्रतिनिधींनी गांगलवाडी, ब्रम्हपुरी, व्याहाड येथे दारूची दुकाने उघडून 'दारूची नगरी' बनवले आहे. गरिबांच्या मुलांसाठी सरकारी शाळा उभारण्याऐवजी स्वत:ची ८० हजार रुपये फी असलेली खाजगी शाळा उभारली. ब्रम्हपुरी महोत्सवाच्या नावाखाली डॉक्टरांकडून वसुली केली जाते आणि पैसे न दिल्यास दवाखाने बंद पाडले जातात. स्मार्ट मीटरच्या विरोधात जनतेला पुढे करून गुन्हे दाखल करायला लावतात, पण लोकप्रतिनिधी स्वत: कुठेही रस्त्यावर आडवे झाले नाहीत. साडेचार वर्षे मतदारसंघाबाहेर राहून अधिवेशनात जालन्याचे व मुंबईचे प्रश्न विचारतात, पण ब्रम्हपुरीच्या दुरवस्थेकडे दुर्लक्ष करतात. २४ तास कामाचे सोंग घेणारे लोकप्रतिनिधी प्रत्यक्षात भ्रष्टाचार करण्यात मग्न आहेत. गटर लाईनच्या कामात प्रचंड भ्रष्टाचार झाला असून सिमेंट रस्त्यांची कामे दोन-दोन वर्षे लटकून पडली आहेत. डॉ. सतिश वारजूरकर यांनी आपल्या भाषणात स्थानिक लोकप्रतिनिधींवर अतिशय आक्रमक भाषेत टीका केली. २०२९ मध्ये भूलथापा देणाऱ्यांना बाजूला सारून बहुजनांना न्याय देणारा लोकप्रतिनिधी निवडून आणण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक भैया यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात 'ब्रम्हपुरी ही सांस्कृतिक नगरी असून सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्र येत उत्सव साजरे करण्याची आपली परंपरा आहे,' असे सांगत त्यांनी आयोजकांचे कौतुक केले.

डॉ. वारजूरकर यांना पाठबळ देत आमदार बंटी भांगडीया म्हणाले, 'सतिशभाऊ तुम्ही काळजी करू नका, खासदार बहीण आणि लहान भाऊ म्हणून मी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. ठरवले तर समोरच्याचा पराभव करून तुम्हाला विधानसभेत पाठवल्याशिवाय आम्ही थांबणार नाही.' असे म्हणून कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आमदार बंटी भांगडीया यांनी केले.

ब्रह्मपुरी येथे आयोजित सार्वजनिक दहीहंडी महोत्सव २०२६ मोठ्या उत्साहात व जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडला. भगवान श्रीकृष्णाच्या बाललीला आणि गोपाळकाल्याच्या परंपरेचे स्मरण करून आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात दहीहंडी फोडण्याचा रोमांचक क्षण, विविध सांस्कृतिक कार्यक्रम तसेच प्रसिद्ध कलाकारांच्या सादरीकरणामुळे उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. एकता, बंधुभाव आणि आनंदाचा संदेश देणारा हा दहीहंडी महोत्सव ब्रह्मपुरीकरांसाठी अविस्मरणीय ठरला. सदर कार्यक्रम सर्व पक्षीय असला तरी भाजपाचे नेते तथा कार्यकर्ते अधिक संख्येने उपस्थित होते, हे विशेष.


Lubi PUMPS-MOTORS

बुधवार बंद

- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.

सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता

गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी

रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी

फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053

Kirloskar CRI

ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान

1994 पासून आपल्या सेवेत

किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404